




सायं दैनिक

# नांदेड वार्ता

www.nandedwarta.com

•वर्ष २४ वे • अंक २५० • शुक्रवार दि.३ जुलै २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना क्र.जी.-२/आरएनपी/एनएनडी-२६२/२०२३-२०२५ • पाने ४ • किंमत १ रु.


## नांदेड जिल्ह्याला यलो अलर्ट जारी

नांदेड/प्रतिनिधी-मुंबई येथील प्रादेशिक हवामान शास्त्र केंद्राने नांदेड जिल्ह्याला दि.३ व ४ जुलै रोजी दोन दिवसाचा यलो अलर्ट जारी केला आहे. जिल्ह्यात तुरळक ठिकाणी तासी ३० ते ४० किमी वेगाने वादळी वारे वाहण्याची तसेच वीजेच्या कडकडाटासह मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता वर्तविली आहे. या संदर्भात संबंधीत यंत्रणा व नागरिकांनी खबरदारी घ्यावी असे आवाहन करण्यात आले.

## राज्यातील शाळांभोवती स्टिंग एनर्जी ड्रिंक्सला बंदी



### राज्य सरकारचा मोठा निर्णय

मुंबई/प्रतिनिधी-राज्यातील विद्यार्थ्यांच्या आरोग्याच्या संरक्षणासाठी राज्य सरकारने महत्त्वाचा निर्णय घेतला असून राज्यभरातील सर्व शाळांच्या ५०० मीटर परिसरात स्टिंग एनर्जी ड्रिंक्सच्या विक्रीवर बंदी घालण्यात येणार आहे. अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांनी शुक्रवारी विधानसभेत ही घोषणा केली. भाजपचे श्रीगोंदा-नगर मतदारसंघाचे आमदार विक्रम पाचपुते यांनी उपस्थित केलेल्या औचित्याच्या मुद्द्यावर उत्तर देताना सरकारने हा निर्णय जाहीर केला.

विधानसभेत बोलताना आमदार विक्रम पाचपुते यांनी प्रत्यक्ष स्टिंग एनर्जी ड्रिंकची बाटली सभागृहात दाखवत त्यावरील इशाऱ्याकडे सरकारचे लक्ष वेधले. संबंधित पेयाच्या लेबलवर हे पेय मुले आणि गर्भवती महिलांसाठी योग्य नाही असा स्पष्ट उल्लेख असताना शाळांबाहेर त्याची सर्रास विक्री होत असल्याबद्दल त्यांनी तीव्र आक्षेप नोंदवला. उत्पादक कँपनी स्वतःच मुलांसाठी हे पेय सुरक्षित नसल्याचे नमूद करत असेल, तर त्याची शाळांजवळ विक्री कशी सुरू आहे, असा सवाल त्यांनी उपस्थित केला.पाचपुते यांनी सांगितले की, अशा एनर्जी ड्रिंक्समध्ये कॅफिन, टॉरिन आणि साखरेचे प्रमाण जास्त असल्याने लहान मुलांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होण्याची शक्यता असते. हृदयाचे ठोके वाढणे, मानसिक अस्वस्थता निर्माण होणे तसेच दीर्घकालीन आरोग्यविषयक समस्या उद्भवू शकतात. ऑनलाईन माध्यमातूनही ही पेये सहज उपलब्ध होत असल्याने त्यासाठीही कठोर नियमावली तयार करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. तसेच देशात एनर्जी ड्रिंक्सची स्पष्ट कायदेशीर व्याख्या नसल्याने स्वतंत्र धोरण तयार करण्याची मागणीही त्यांनी केली. यावर उत्तर देताना अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांचे आरोग्य ही सरकारची सर्वोच्च प्राथमिकता आहे. स्टिंगसह काही एनर्जी ड्रिंक्समधील घटक लहान मुलांसाठी हानिकारक ठरू शकतात. त्यामुळे राज्यातील सर्व शाळांच्या ५०० मीटर परिसरात अशा **पान ४ वर**

## उमरखेड येथील व्यापाऱ्याच्या वाहनातून ४ लाख रु.असलेली बॅग चोरट्यांनी पळवली



नांदेड/प्रतिनिधी-नांदेड शहरातील मालेगाव रोडवर आज (शुक्रवार) दुपारी उमरखेड येथील व्यापाऱ्याच्या वाहनातून ४ लाख रुपये रक्कम असलेली बॅग चोरट्यांनी लंपास केल्याची घटना घडली आहे.

उमरखेड येथील पेन्टसचे व्यापारी सुजीत भीमराव सुरवसे हे आज (शुक्रवार) कार घेवून कामानिमित्त नांदेडला आले होते. मालेगाव रोडवरील एसबीआय **पान ४ वर**


## नांदेड येथे पुरपरिस्थितीचा सामना करण्यासाठी धुळे येथील एसडीआरएफची तुकडी तैनात

नांदेड/प्रतिनिधी-राज्यात मान्सून कालावधीत संभाव्य पूरपरिस्थितीचा सामना करण्यासाठी मराठवाडा क्षेत्रांसाठी राज्य आपत्ती प्रतिसाद दल, (एसडीआरएफ) धुळे येथील एक तुकडी राज्य शासनाच्या आदेशावरुन नांदेड येथे तैनात करण्यात आली असून या तुकडीत ३ अधिकारी व ३३ कर्मचाऱ्यांचा समावेश आहे.

मागील चार वर्षापासुन मान्सून कालावधीत संभाव्य पूरपरिस्थितीचा सामना करण्यासाठी मराठवाडा क्षेत्रांसाठी राज्य आपत्ती प्रतिसाद दल, धुळे (एसडीआरएफ) येथील एक तुकडी नांदेड येथे तैनात केली जात आहे. मागील वर्षी मुखेड, देगलूर, धर्माबाद, नायगांव, नांदेड, अर्धापुर सह नांदेड जिल्हयातील पुरपिडीत भागात या तुकडीने मोठ्या प्रमाणात शोध व बचाव कार्य केलेले आहे. मुखेड तालुक्यातील मुक्रामाबाद मंडळामध्ये अतिवृष्टीमुळे निर्माण झालेल्या ऑगस्टमधील पुरपरस्थितीमध्ये एका दिवसामध्ये ३८६ पुरग्रस्तांचे शोध व बचाव कार्य या तुकडीकडुन केले आहे. यावर्षीही तुकडी मराठवाडा क्षेत्रासाठी सुसज्ज साहित्यातिशी नांदेड येथे तैनात झालेली आहे. आज या एसडीआरएफ तुकडीने जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण राहुल कर्डिले यांची भेट घेऊन रिपोंटींग केले. या दरम्यान जिल्हाधिकारी नांदेड यांनी त्यांना सर्तक, सुसज्ज राहुन आपत्तीला शिघ्र प्रतसिाद दयावा. तसेच नांदेड जिल्हयातील १६ तालुक्यातील स्थानीक शोध व बचाव पथक तसेच आपत्तीशी निगडीत यंत्रणा, विभांगाना प्रशिक्षण देण्याच्याही सुचना दिल्या आहेत.

## राम मंदिर दानचोरीवरुन ठाकरे सेनेचे राज्यव्यापी रामरक्षा आंदोलन

मुंबई/प्रतिनिधी-अयोध्येतील राम मंदिरातील दानचोरी प्रकरणावरून देशात खळबळ उडाली आहे. गंभीर बाब म्हणजे या विषयावर भारतीय जनता पक्षाचे नेते तसेच खुद्द पंतप्रधान नरेंद्र आणि गृहमंत्री अमित शहा यांनी कोणतेही वक्तव्य केलेले नाही. यावरून राम मंदिरासाठी रक्त सांडणाऱ्यांचे रक्त वाया जाऊ नये म्हणून ५ जुलैपासून राज्यव्यापी रामरक्षा आंदोलन करणार असल्याची घोषणा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख व माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी शुक्रवारी (३ जुलै) रोजी आयोजित पत्रकार परिषदेत बोलतांना केली.



राम मंदिरातील देणग्यांचा अपहार आणि दानपेटीतील पैशांची चोरी यावरून वातावरण तापले आहे. या प्रकरणी आठ जणांवर गुन्हे दाखल झाले असून ते कोठडीत आहेत. तर राम मंदिर न्यास तीर्थक्षेत्रचे महासचिव चंपत राय आणि सदस्य अनिल मिश्रा यांनी पदांचे राजीनामे दिले आहेत. एवढे गंभीर प्रकरण असूनही भाजपच्या नेत्यांनी यावर मौन बाळगल्याबद्दल उद्धव ठाकरे यांनी टीका केली. आज संपूर्ण देश भाजपच्या अंमलाखाली आहे. राम मंदिराच्या आंदोलनात शिवसेना आणि हिंदू सहभागी झाले होते. त्यावेळी भाजपचे दोन खासदार होते आणि भाजपने तेव्हा गांधीवादी समाजवाद अंगिकारला होता. नंतर त्यांनी हिंदुत्ववादी भूमिका घेतली, अशी टीका उद्धव ठाकरे यांनी केली.आता राम मंदिर आहे मात्र, मंदिरात दरोडेखोरी सुरू आहे. यांच्याकडून पक्ष, आमदार-खासदार फोडले जातात. त्याला ऑपरेशन नाव दिले जाते. भाजपच्या याच ऑपरेशन राम मंदिराला विरोध आहे, असे उद्धव ठाकरे यांनी स्पष्ट केले. त्याचवेळी राम मंदिरातील तिजोरीतील चोरीचा पैसा पक्ष फोडाफोडीसाठी वापरल्याचा आरोप होत असल्याचेही त्यांनी सांगितले. म्हणूनच अब हिंदू माफ नही करेगा असे म्हणत रामरक्षा आंदोलन सुरू करत आहोत, अशी घोषणा उद्धव ठाकरे यांनी केली. या आंदोलनाची सुरुवात मुंबईतून ५ जुलै रोजी दुपारी ४ वाजता दादरमधील हनुमान मंदिराजवळून केली जाणार आहे. या आंदोलनात ज्यांना दानचोरीचा जाब विचारायचा आहे अशा रामभक्तांनी आंदोलनात सहभागी व्हावे, **पान ४ वर**

## नांदेडमध्ये दोन शाळांमधील शालेय पोषण आहाराची तपासणी

### सुमारे २ लाख ३४ हजार रुपयाचा अन्नसाठा जप्त

नांदेड/प्रतिनिधी-अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या निर्देशानुसार २ जुलै २०२६ रोजी नांदेड येथे शालेय पोषण आहाराची तपासणी करण्यात आली. अन्न सुरक्षा अधिकारी शिल्पा श्रीरामे यांनी सहकारी अन्न सुरक्षा अधिकारी व्ही. एस. लोंढे, अरुण तम्मडवार, अमृता दुधाटे आणि अ. नं. गिरी यांच्या पथकासह दोन शाळांमधील पोषण आहार विभागाची तपासणी करून विविध अन्नपदार्थांचे नमुने विश्लेषणासाठी घेतले.

बाबानगर येथील सावित्रीबाई फुले माध्यमिक विद्यालयात रिफाइंड सोयाबीन तेल, सोया वडी, तांदूळ आणि तूर डाळ यांचे नमुने तपासणीसाठी घेण्यात आले. तसेच सोया वडी या अन्न पदार्थाचा उर्वरित साठा (३९८ किलो), तांदूळ (२,९९८ किलो) आणि तूर डाळ (९९८ किलो) असा एकूण २ लाख २४ हजार ५३० रुपयांचा अन्नसाठा जप्त करण्यात आला. यानंतर वसंतनगर येथील राजर्षी शाहू विद्यालयात सोया वडी, तांदूळ आणि मूग डाळ यांचे नमुने विश्लेषणासाठी घेण्यात आले. येथे उर्वरित ९८ किलो सोया वडीचा ९ हजार ८०० रुपयांचा साठा जप्त करण्यात आला. प्रयोगशाळेतील विश्लेषण अहवाल प्राप्त झाल्यानंतर अन्न सुरक्षा व मानके कायद्यानुसार पुढील कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचे अन्न व औषध प्रशासनाने स्पष्ट केले आहे.ही कारवाई सहायक आयुक्त सु.द. जिंतुरकर तसेच छत्रपती संभाजीनगर विभागाचे सहआयुक्त (अन्न) श्रीकांत करकाळे यांच्या मार्गदर्शनाखाली अन्न सुरक्षा अधिकारी शिल्पा श्रीरामे व त्यांच्या पथकाने पार पाडली.

## धान्याअभावी पोषण आहाराची घडी विस्कटली

### माहूर तालुक्यात अनेक शाळांत खिचडीच शिजेना

माहूर/प्रतिनिधी-नवीन शैक्षणिक वर्ष सुरू होऊन जवळपास २० दिवस उलटले असतानाही माहूर तालुक्यातील अनेक शाळांना शालेय पोषण आहारासाठी आवश्यक धान्याचा पुरवठा झालेला नसल्याने पोषण आहार योजनेची अंमलबजावणी विस्कळीत झाली आहे. धान्याअभावी काही शाळांमध्ये विद्यार्थ्यांसाठी खिचडीही शिजवता येत नसल्याची परिस्थिती निर्माण झाली असून शिक्षकांना मोठी कसरत करावी लागत आहे.

माहूर तालुक्यात जिल्हा परिषदेच्या १२३ व खासगी १८ अशा एकूण १४१ शाळा आहेत. शासनाच्या नियमानुसार विद्यार्थ्यांना मसालेभात, मूगडाळ खिचडी, चणा पुलाव, सोयाबीन पुलाव, मटकीची उसळ-भात, वरण-भात, मोड आलेली कडधान्ये आदी सकस पदार्थ देण्याचे नियोजन आहे. मात्र, अनेक शाळांमध्ये तांदूळ, डाळ तसेच इतर आवश्यक साहित्यच उपलब्ध नसल्याने नियोजित मेनूनुसार आहार देणे शक्य होत नसल्याचे शिक्षकांनी सांगितले. विद्यार्थ्यांचा पोषण आहार खंडित होऊ नये म्हणून काही ठिकाणी शिक्षकांना स्वतःच्या खिशातून खर्च करून साहित्य खरेदी करावे लागत असल्याची माहिती समोर आली आहे. तर काही शाळांमध्ये तांदूळ असून डाळ नाही, तर काही ठिकाणी तेल, मीठ, तिखट, हळद यांसारख्या आवश्यक वस्तूंचाही तुटवडा आहे.केंद्र पुरस्कृत शालेय पोषण आहार योजना १९९५-९६ पासून राबविली जात असून पहिली ते आठवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना सकस आहार देण्याचा उद्देश आहे. मात्र, शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीलाच धान्य पुरवठ्यात झालेल्या विलंबामुळे या योजनेच्या अंमलबजावणीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

**शिक्षकांची व्यथा**

विद्यार्थ्यांचा पोषण आहार बंद पडू नये म्हणून उपलब्ध साहित्यावरच तडजोड करावी लागत आहे. काही ठिकाणी स्वतःच्या खिशातून खर्च करण्याची वेळही आली आहे, अशी भावना काही शिक्षकांनी व्यक्त केली.

## महापालिका व शहर वाहतूक पोलीसांनी बाफना रोडवरील अतिक्रमणे हटवली

नांदेड/प्रतिनिधी-शहरातील प्रमुख वर्दळीचा रस्ता असलेला बाफना रोडवरील अतिक्रमण महापालिका अतिक्रमण विरोधी पथक व शहर वाहतूक पोलीसांनी आज (शुक्रवार) संयुक्त मोहीम राबवून हटविले आहे.

हिंगोली गेट ते देगलूर नाका हा शहरातील वर्दळीचा एक प्रमुख रस्ता आहे. हिंगोली गेट ते बाफना टी पॉईंट पर्यंत रस्त्याच्या दोन्ही बाजुनी व्यापाऱ्यांनी अतिक्रमण केले होते. तसेच रस्त्याच्या बाजूलाच वाहने उभी करुन वाहतुकीला अडथळा निर्माण करीत असत. महापालिकेच्या अतिक्रमण विरोधी पथक तसेच शहर वाहतूक पोलीस विभागाच्या इतवारा व वजिराबाद शाखेने संयुक्त मोहीम राबवून हिंगोली गेट ते कविता हॉटेल व बरकत कॉम्प्लेक्स ते कविता हॉटेल या मार्गावरील दोन्ही बाजुचे अतिक्रमण पोलीस बंदोबस्तात हटविण्यात आले. दोन जेसीबी मशिन, चार ट्रॅक्टरचा वापर करण्यात आला. अतिक्रमण हटाव मोहीमेत महापालिकेचे अधिकारी व कर्मचारी तसेच शहर वाहतूक शाखेचे अधिकारी व कर्मचारी, दोन




आरसीपी प्लॅटूनचे कर्मचारी सहभागी झाले होते. रस्त्याच्या बाजुला व चौकात वाहने उभे करुन वाहतुकीला अडथळा आणणाऱ्या वाहन चालकांवरही कारवाई करण्यात आली.

## राम मंदिर दानचोरीमुळे भक्तांच्या भावना दुखावल्या

### रास्वसंघाचे सरकार्यवाहक दत्तात्रेय होसबळे यांची प्रतिक्रिया

मुंबई/प्रतिनिधी-अयोध्येतील श्रीराम मंदिरातील दान चोरी प्रकरणाने संपूर्ण देशात एकच खळबळ उडवली आहे. यावर एकीकडे देशभर चर्चा सुरु असताना राष्ट्रीय स्वयंसेवक संघ याबाबत काय भूमिका घेणार? याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. अशामध्ये आता राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरकार्यवाह दत्तात्रेय होसबळे यांनी एक व्हिडीओ जारी



करत संघाची भूमिका स्पष्ट केली आहे. दानपेट्यांमधून झालेल्या चोरीमुळे रामभक्तांच्या श्रद्धेला धक्का बसला आहे. एसआयटीच्या तपासात जो कोणी दोषी आढळेल त्याला कठोर शिक्षा झाली पाहिजे. अशी भावना त्यांनी यावेळी व्यक्त केली आहे.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाकडून जारी केलेल्या व्हिडीओमध्ये सरकार्यवाह होसबळे म्हणाले की, पिढ्यानपिढ्यांच्या संघर्षामुळे आणि लाखो रामभक्तांच्या समर्पण, त्याग आणि भक्तीमुळे श्रीरामांच्या जन्मस्थानी **पान ४ वर**

# तेल स्वस्त...जनता मात्र महागाईच्या खाईत!

**आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या (क्रूड ऑईल) किमतीत गेल्या काही महिन्यांत २५ टक्क्यांहून अधिक घसरण झाली आहे. जागतिक अर्थ व्यवस्थेतील मंदीची चिन्हे, उत्पादनातील वाढ आणि मागणीतील घट यामुळे तेलाच्या किमती नरमल्या आहेत. अशा वेळी भारतातील सामान्य नागरिकांची अपेक्षा स्वाभाविक आहे की पेट्रोल, डिझेल आणि घरगुती गॅसच्या किमतीतही दिलासा मिळावा. परंतु वास्तव पाहिले तर आंतरराष्ट्रीय बाजारात तेल स्वस्त होत असताना देशांतर्गत इंधनाच्या किमती मात्र जवळपास स्थिरच आहेत. परिणामी, ''तेल स्वस्त...जनता मात्र महागाईच्या खाईत!'' हे आजचे वास्तव बनले आहे. भारतातील अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या वाहतूक व्यवस्थेचा आधार पेट्रोल आणि डिझेलवर आहे. इंधनाच्या किमती वाढल्या की त्याचा परिणाम शेती, उद्योग, व्यापार, सार्वजनिक वाहतूक आणि जीवनावश्यक वस्तूंच्या किमतींवर होतो. ट्रक, बस, मालवाहतूक आणि कृषी क्षेत्रातील यंत्रसामग्रीचा खर्च वाढल्याने अखेरीस त्याचे ओझे ग्राहकांच्या खिशावर पडते. त्यामुळे इंधन दरवाढ म्हणजे केवळ वाहनधारकांचा प्रश्न नसून ती प्रत्येक घरातील स्वयंपाक घरापासून बाजारपेठेपर्यंत पोहोचणारी महागाईची साखळी आहे.विशेष म्हणजे आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमती वाढल्या की, देशात पेट्रोल-डिझेलच्या दरवाढीचा निर्णय फार विलंब न लावता घेतला जातो. मात्र त्याच किमती मोठ्या प्रमाणात घसरल्यानंतर दरकपात करण्याबाबत मात्र अनाकलनीय शांतता पाळली जाते. हा विरोधाभास सर्वसामान्य नागरिकांच्या मनात प्रश्न निर्माण करतो. तेल कंपन्या बाजारभावानुसार किंमती ठरवतात, असे सांगितले जाते. मग बाजारभाव खाली आला असताना त्याचा लाभ ग्राहकांपर्यंत का पोहोचत नाही? याचे एक महत्त्वाचे कारण म्हणजे इंधनावरील कर रचना. पेट्रोल आणि डिझेलच्या किरकोळ किमतीमध्ये केंद्र सरकारचे उत्पादन शुल्क, राज्य सरकारांचा मूल्यवर्धित कर (व्हॅट), विविध उपकर, वाहतूक खर्च आणि विक्रेत्यांचे कमिशन यांचा मोठा वाटा असतो. अनेकदा ग्राहक भरत असलेल्या एकूण रकमेपैकी जवळपास निम्मा हिस्सा करांच्या स्वरूपात सरकारकडे जातो. त्यामुळे कच्चे तेल स्वस्त झाले तरी त्याचा थेट फायदा ग्राहकाला मिळत नाही. सरकारसाठी इंधन हा महसूल मिळवण्याचा मोठा स्रोत बनला आहे, ही वस्तुस्थिती नाकारता येणार नाही. सरकारला महसूल आवश्यकच आहे. पायाभूत सुविधा, सामाजिक कल्याणाच्या योजना, संरक्षण आणि विकासकामांसाठी निधी लागतो. मात्र महसूल वाढविण्याचा सर्वात सोपा मार्ग म्हणून इंधनावरील कर कायम वाढवत ठेवणे किंवा कमी न करणे, हा न्याय्य दृष्टिकोन ठरू शकत नाही. विशेषतः महागाईने त्रस्त असलेल्या मध्यमवर्गीय, शेतकरी, कामगार आणि लघु उद्योजकांना दिलासा देण्याची जबाबदारीही सरकारचीच आहे. आज शेतकऱ्यांसमोर उत्पादन खर्च वाढण्याचे मोठे संकट आहे. डिझेलवर चालणारे पंप, ट्रॅक्टर, कापणी यंत्रे आणि मालवाहतूक यांचा खर्च वाढल्याने शेती परवडेनाशी होत आहे. उद्योग क्षेत्रात वाहतूक खर्च वाढल्याने उत्पादन महाग होते. त्याचा परिणाम बाजारातील वस्तूंच्या वाढत्या किमतींमध्ये दिसून येतो. अशा परिस्थितीत इंधन दरात कपात केल्यास महागाई कमी करण्यासाठी मोठी मदत होऊ शकते. हा निर्णय केवळ ग्राहकांसाठी नव्हे, तर संपूर्ण अर्थ व्यवस्थेसाठी लाभदायक ठरेल. इंधनाच्या किमतीचा विषय दुर्दैवाने राजकारणाचाही भाग बनला आहे. विरोधी पक्ष सत्तेबाहेर असताना दरवाढीविरोधात रस्त्यावर उतरतात; मात्र सत्तेत आल्यानंतर त्याच प्रश्नावर मौन धारण करतात. त्यामुळे जनतेचा राजकीय व्यवस्थेवरील विश्वास कमी होतो. इंधन दर निश्चितीची प्रक्रिया अधिक पारदर्शक आणि उत्तरदायी होणे ही काळाची गरज आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमतीत किती बदल झाला आणि त्याचा देशांतर्गत दरांवर किती परिणाम झाला, याची माहिती नियमितपणे जनतेसमोर ठेवली गेली पाहिजे.कच्च्या तेलाच्या किमतीत मोठी घसरण होऊनही सामान्य नागरिकाला त्याचा लाभ मिळत नसेल, तर आर्थिक सुधारणांचा अर्थ काय?, असा प्रश्न निर्माण होतो. सरकारने महसूल आणि जनहित यांच्यात संतुलन राखत इंधनावरील करांचा फेरविचार करणे आवश्यक आहे. महागाईने होरपळलेल्या जनतेला दिलासा देण्याची हीच योग्य वेळ आहे. अन्यथा आंतरराष्ट्रीय बाजारात तेल कितीही स्वस्त झाले तरी भारतीय नागरिकासाठी पेट्रोल-डिझेल महागच राहील आणि ''जनतेची लूट थांबणार कधी?'' हा प्रश्न अधिक तीव्र होत जाईल.**

# देशातील अग्नी सुरक्षा वाऱ्यावर; लोकांचा जीव टांगणीवर!




**रमेश लांजेवार**
नागपूर

लखनौमध्ये कोचिंग सेंटरमध्ये झालेले अग्नितांडव मानवतेसाठी अंगावर शहारे येणारी भयावह घटना आहे.या अग्नीकांड वरून लक्षात येते की, सरकारच्या व प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे अशा भयावह घटना दिवसेंदिवस आक्राळविक्राळ रूप धारण करीत आहे आणि देशात दररोज कुठे ना कुठे छोटे-मोठे अग्नी तांडव झाल्याचे दिसून येते व यात निरअपराधांचा बळी जात आहे. कारण लखनौमधील कोचिंग सेंटर हे अवैधरित्या चालायचे यामध्ये वाजवीपेक्षा जास्त विद्यार्थी, संपूर्ण नियमांचे उल्लंघन, अग्नी सुरक्षा किँवा आपात्कालीन व्यवस्थेचा अभाव या संपूर्ण गोष्टींचा अभाव लखनौ अग्नीकांडमध्ये दिसून याला आणि याला जबाबदार सर्वप्रथम तेथील प्रशासन व नंतर सरकार. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या कोचिंग सेंटरवर सरकारने अगोदरच कारवाई केली असती आणि विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टिकोनातून चौकशी केली असती तर ही दुर्घटना टाळता आली असती.आज सरकार अग्नीकांड पहाता त्या कोचिंग सेंटर मालकावर कारवाई करीत आहे व बुलडोझर ॲक्शन होत आहे हेच काम सरकारने अगोदरच केले असते तर अनेकांचा जीव वाचला असता व आज ही गंभीर स्थिती निर्माण झाली नसती.

देशासह राज्यात अनेक काणून-कायदे-नियमावली आहेत परंतु कोणत्याही नियमांचे पालन होत नाही.हे संपूर्ण कायदे-काणून- नियमावली धुऱ्यावर ठेवून (बाजुला सारुन) प्रशासनाच्या मदतीने (भ्रष्टाचाराच्या मार्गाने) बेधडक अवैध धंदे व कामे सुरू आहेत याचे जिवंत उदाहरण म्हणजे लखनौ अग्नीकांड.यामध्ये सरकारची व संबंधित विभागाची साठगाठ सुध्दा असते. देशातील कोचिंगक्लासेस, हॉटेल,लॉज,सरकारी दवाखाने, खाजगी दवाखाने,फुटपाथ आजही असुरक्षित आहे व याचा परिणाम जीवितहानीमध्ये होतो. आगीच्या दृष्टीकोणातुन कोणतेच ऑडिट गांभीर्याने प्रशासनाकडुन घेतले जात नाही व सरकारही यावर जातीने लक्ष देत नाही.कारण यामध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार होतो व यात मोठमोठे अधिकारी आणि राजकीय पुढारी सहभागी असतात.याची दुर्गंधी संपूर्ण देशात पसरतांना दिसून येते व त्याचे प्रायश्चित्त दुर्घटनेच्या रूपात सर्वसामान्य व भोळ्याभाबड्या जनतेला जीवीत हाणीच्या स्वरूपात भोगावे लागते व त्याचा परिणाम संपूर्ण परिवारावर होतो. अग्निकांडसारख्या भयावह घटनांवर सरकार चौकशी बसविते परंतु हा सर्व दिखावा असतो. दिनांक २२ जून २०२६ ला लखनौमधील अलिगंज भागात एका तीन मजली व्यावसायिक इमारतीला लागलेल्या भीषण आगीत १५ विद्यार्थ्यांचा गुदमरून व होरपळून दुर्दैवी मृत्यू झाला तर अनेक जण गंभीर जखमी झाले आणि ही हृदयद्रावक घटना घडली व कोचिंग सेंटर मृत्यूचे सेंटर बनले. सध्याच्या परिस्थितीत देशात प्रशासनाच्या चुकांमुळे दिवसेंदिवस अग्निकांडच्या घटनांमध्ये वाढ होतांना दिसत आहे.याला कारणीभूत वाढते शहरीकरण व त्यामुळे उत्पन्न होणारी गंभीर परिस्थिती सुध्दा कारणीभूत आहे.उत्तरप्रदेश सरकारने माफीया राज,गुंडाराज यावर बुलडोझर चालविले. परंतु प्रशासनाच्या देखरेखीखाली अवैध कामे सुरू आहे आणि यात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार होत आहे ही बाब सरकारच्या अजूनपर्यंत लक्षात कसे काय आले नाही? सर्वसामान्यांना ज्या मुलभूत सुविधांची गरज आहे त्या सुविधांपासून उत्तर प्रदेशातील जनता व देशातील जनता कोसो दूर असल्याचे नुकत्याच झालेल्या लखनौ अग्नितांडवावरून दिसून येते. असेच अग्नितांडव देशातील अनेक राज्यात झालेले आहेत आणि होत आहेत हे आपण उघड्या डोळ्यांनी पाहत आहोत. परंतु त्यांच्यावर देशातील संपूर्ण राज्य सरकारे तात्पुरती कारवाई करून सरकारकडून पांघरूण टाकल्याचे काम केले जाते.३ जून २०२६ ला दिल्लीतील मालवीय नगर परिसरातील एका हॉटेलला आग लागली होती यात २१ जनांचा मृत्यू झाला होता,उत्तर गोव्यातील पणजी पासून २५ किमी अंतरावर असलेल्या अर्पोरा येथील बर्च बाय रोमियो लेनया गर्दीने तुडुंब भरलेल्या नाइट क्लबला दिनांक ६ डिसेंबर २०२५ ला मध्यरात्री लागलेल्या भीषण आगीत २५ जणांचा होरपळून मृत्यू झाला,तर १६ जण गंभीररित्या जखमी झाले होते,याचप्रमाणे तेलंगाणाची राजधानी हैदराबाद येथील ऐतिहासिक चारमिनारस्थित गुलजार हाऊसच्या एका इमारतीला दिनांक १८ मे २०२५ ला सकाळी भीषण आग लागली होती या भीषण आगीत दुर्दैवाने ८ बालकांसह १७ जणांचा होरपळून व गुदमरून मृत्यू झाला होता अशा अनेक अनगिनत भयावह घटना देशातील अनेक राज्यात मोठ्या प्रमाणात होत आहे आणि राज्य सरकारे उघड्या डोळ्यांनी पाहत आहे ही अत्यंत गंभीर व चिंताजनक बाब आहे. देशातील जनता असुरक्षित का आहे याचे मुख्य कारण म्हणजे देशातील वाढता भ्रष्टाचार.कारण अती संवेदनशील कामाची नाहरकत प्रमाणपत्र (एनओसी) सरकारकडून भ्रष्टाचाराच्या माध्यमातून सहज उपलब्ध होते आणि त्यातून अशाप्रकारच्या भयावह घटनांचा उदय होतो.आजही देशात अवैध निर्माण, अवैध धंदे मोठ्या प्रमाणात राजकीय पुढाऱ्यांचे आहेत किँवा त्यांच्या चेलेचपाट्यांचे आहेत.आज देशात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार सुरू आहे तर काही भ्रष्टाचारी सरकारमध्ये सहभागी आहेत.उदाहरण द्यायचे झाले तर अशोक खरात याचे प्रकरण खूप गाजले यांचा करोडोंचा घोटाळा सरकारच्या निदर्शनास सुध्दा आला.परंतु त्यांच्या मालमत्तेवर सरकारने अजून पर्यंत बुलडोझर चालविले नाही किँवा त्याच्यावर कोणतीही कठोर शिक्षा ठोठावण्यात आली नाही.अशाप्रकारे देशात अनेक भ्रष्टाचारी दिसून येतात व त्यांचे अवैध धंदे दिसून येतात.परंतू यांच्या चुकांचे प्रायश्चित्त देशातील जनतेला मृत्यूच्या रूपात भोगावे लागते.लखनौ अग्नीकांड लक्षात घेता देशातील संपूर्ण राज्य सरकारे जागी झाली आणि महाराष्ट्राची उपराजधानी नागपूरमध्ये अग्निशमन विभागाने कारवाईला सुरुवात केली यात १०३ शिकवणी वर्ग (कोचिंग क्लासेस)धोकादायक श्रेणीमध्ये असल्याचे दिसून आले ही फक्त नागपूरची स्थिती आहे यावरून आपण समजू शकतो की,राज्यासह देशातील स्थिती किती भयानक असावी यावरून स्पष्ट होते. देशातील राज्य सरकारे आतापर्यंत झोपून होती.लोकांचा जीव जातो तेव्हा सरकारच्या किँवा संबंधित विभागाला जाग येते ही देशाची शोकांतिका म्हणावी लागेल.त्यामुळे लखनौ अग्निप्रलयातून संपूर्ण राज्य सरकारने व केंद्र सरकारने धडा घ्यावा व जनतेच्या सुरक्षेची जबाबदारी स्वीकारावी.जय हिंद.

# कुंडलवाडीत मोफत नेत्र तपासणी शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

## २६२ रुग्णांची तपासणी,८२ मोतीबिंदू रुग्णांवर होणार मोफत शस्त्रक्रिया

कुंडलवाडी/प्रतिनिधी- एल. व्ही. प्रसाद आय इन्स्टिट्यूट, हैदराबाद (भोसले गोपाळराव पाटील आय सेंटर, मुधोळ) यांच्या सहकार्याने मुक्तांगण सेवाभावी संस्था, धर्माबाद व कै. के. रामलू साहेब प्रतिष्ठान, कुंडलवाडी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या मोफत नेत्र तपासणी व शस्त्रक्रिया शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. शिबिरात एकूण २६२ रुग्णांची नेत्र तपासणी करण्यात आली.

तपासणीदरम्यान ८२ रुग्णांमध्ये मोतीबिंदू, तर ४४ रुग्णांमध्ये डोळ्याच्या मांसवृद्धीचे निदान झाले. शस्त्रक्रियेसाठी पात्र ठरलेल्या रुग्णांवर मुधोळ येथील भोसले गोपाळराव पाटील आय सेंटरमध्ये मोफत शस्त्रक्रिया व मोफत लेन्स प्रत्यारोपण करण्यात येणार आहे. तसेच रुग्णांच्या ने-आणीसाठी कुंडलवाडी नगरपरिषदेपासून सकाळी मोफत वाहतुकीची सुविधाही उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली. शिबिराचे उद्घाटन माजी जि.प. सदस्य तथा भाजपचे जिल्हा सरचिटणीस लक्ष्मणरावजी ठक्कुरवार यांच्या हस्ते झाले. यावेळी त्यांनी अशा सामाजिक व आरोग्यविषयक उपक्रमांची समाजाला मोठी गरज असल्याचे सांगत आयोजकांचे कौतुक केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नगराध्यक्षा प्रेरणाताई गजानन कोटलावार या होत्या. अध्यक्षीय भाषणात त्यांनी भविष्यातही कुंडलवाडी शहरात अशाच स्वरूपाची अधिकाधिक आरोग्य शिबिरे आयोजित करण्याचा मानस व्यक्त केला. यावेळी उपनगराध्यक्षा नेहाताई शैलेश ऱ्याकावार, माजी चेअरमन साईनाथ गोविंदु उत्तरवार, माजी उपाध्यक्ष तथा नगरसेवक राजेश्वर गोविंदु उत्तरवार, माजी केंद्रप्रमुख गंगाधर पोरडवार, मुक्तांगण सेवाभावी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. गोविंद पांडुरंग चौधरी, भाजप डॉक्टर्स सेलचे जिल्हा संयोजक डॉ. हनुमंतराव लखमपुरे, नगराध्यक्ष प्रतिनिधी गजानन कोटलावार, उपनगराध्यक्ष प्रतिनिधी शैलेश ऱ्याकावार, इंजी. अशोक गरुडकर, कॅम्प इन्चार्ज डॉ. टी. लक्ष्मण चिन्णा, नगरसेवक डॉ. प्रशांत सब्बनवार, प्रकाश पा. अर्जने, प्रदीप खेळगे, सर्व नगरसेवक-नगरसेविका तसेच एल. व्ही. प्रसाद आय इन्स्टिट्यूटचे सहकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी नगरपरिषद कुंडलवाडी, एल. व्ही. प्रसाद आय इन्स्टिट्यूट, मुक्तांगण सेवाभावी संस्था, कै. के. रामलू साहेब प्रतिष्ठान तसेच अध्यक्ष गजानन कोटलावार यांचे विशेष सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. नरेश बोधनकर यांनी केले. उपस्थित नागरिकांनी या आरोग्यदायी उपक्रमाचे स्वागत करत आयोजकांच्या सामाजिक बांधिलकीचे कौतुक केले.

# नांदेडमध्ये दुर्मिळ 'इंडियन पेंटेड फ्रॉग'चे दर्शन;अधिवास संरक्षणाचे आवाहन

उमरखेड/प्रतिनिधी- नांदेडमधील एका निवासी भागात 'इंडियन पेंटेड फ्रॉग' (Uperodon taprobanicur) ही दुर्मिळ आणि अत्यंत देखणी बेडकाची प्रजाती आढळून आली आहे. स्थानिक जैवविविधतेच्या दृष्टीने ही घटना महत्त्वपूर्ण मानली जात आहे.



प्राप्त माहितीनुसार, नांदेड येथील नागरिक प्रा. डॉ. विशाल मराठे यांच्या निवासस्थानी हा बेडूक अनपेक्षितपणे आढळला. त्याच्या वैशिष्ट्यपूर्ण रंगसंगतीमुळे त्याने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. यानंतर ही माहिती उमरखेड येथील गो. सी. गावंडे विद्यालयातील, नैसर्गिक पर्यावरण संवर्धन संस्थेचे सदस्य व प्राणिशास्त्रज्ञ प्रा. डॉ. संदीप चेडे यांच्यापर्यंत पोहोचवण्यात आली. डॉ. चेडे यांनी पाहणी करून हा बेडूक 'इंडियन पेंटेड फ्रॉग' असल्याचे अधिकृतपणे स्पष्ट केले. ही प्रजाती जमिनीखाली पोखरून राहण्याच्या सवयीमुळे 'फॉसोरियल' म्हणून ओळखली जाते. 'इंडियन पेंटेड फ्रॉग' ही प्रजाती प्रामुख्याने दक्षिण भारत आणि श्रीलंकेत आढळते. मराठवाड्यासारख्या निम-ओसाड भागात तिची नोंद होणे दुर्मिळ आहे. हे बेडूक वर्षातील बराच काळ जमिनीखाली घालवतात आणि केवळ मुसळधार पावसात विणीच्या हंगामासाठी तात्पुरत्या डबक्यांजवळ येतात. शहरी भागात त्यांचे दर्शन होणे हे वन्यजीव बदलत्या पर्यावरणाशी कसे जुळवून घेत आहेत, याचे उदाहरण आहे.या शोधाचे महत्त्व विषद करताना डॉ. संदीप चेडे म्हणाले, उभयचर प्राणी पर्यावरणाच्या आरोग्याचे महत्त्वाचे जैविक संकेतक आहेत. नांदेडमध्ये हा भुयारी बेडूक सापडणे हे दर्शवते की आपल्या परिसंस्थेत अजूनही दुर्लक्षित जैवविविधता आहे. मात्र, वाढते शहरीकरण, कीटकनाशकांचा वापर आणि पाणथळ जागांचा ऱ्हास यामुळे त्यांच्या अस्तित्वाला धोका आहे. या प्रजाती नामशेष होण्यापूर्वी स्थानिक अधिवासांचे जतन आणि जनजागृती करणे गरजेचे आहे. या शोधाचे नैसर्गिक पर्यावरण संवर्धन संस्था, उमरखेडचे प्रभाकर दिघेवार, गजानन रासकर, दीपक ठाकरे, विष्णू दुधेवार, देविदास कानडे, राजेश भोकरे आदी पर्यावरणप्रेमींनी स्वागत केले आहे. या नोंदीमुळे परिसरातील दुर्लक्षित उभयचर जैवविविधतेचे दस्तऐवजीकरण व संवर्धन करण्यास मदत होईल, अशी आशा त्यांनी व्यक्त केली.

**तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार कंधार यांचे कार्यालय**

Email Id:tahkadhar@gmail.com जा.क्रं.२०२६/ज.मृ.नो./कावी
दुरध्वनी क्र.२२३१००-०२४६६ दिनांक - २८/०६/२०२६

**(जन्म मृत्यू शाखा)**

**जाहीर प्रगटन**

याद्वारे प्रगटन देण्यात येते की अर्जदार सावली सूर्यकांत जोंधळे रा.कोटबाजार ता.कंधार जि. नांदेड यांनी या कार्यालयात त्यांचा सावली सूर्यकांत जोंधळे रा.कोटबाजार ता.कंधार जि.नांदेड यांचे जन्म/मृत्यू प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होण्याकरिता मागणी केली आहे.

जन्म/मृत्यू झालेल्यांचे नाव सावली सूर्यकांत जोंधळे रा.कोटबाजार ता.कंधार या ठिकाणी दिनांक २५/०६/२००४ या दिवशी जन्म/मृत्यू झाला असून प्रमाणपत्र मिळण्याकरिता आदेश होणे करिता सदर तहसील कार्यालय कंधार येथे दिनांक १७/०६/२०२६ रोजी अर्ज सादर केला आहे.

वरील जन्म/मृत्यू दिनांक बाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप तहसील कार्यालय कंधार येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

स्वाक्षरित/-
तहसीलदार कंधार

सायंदैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
**मुख्यसंपादक**-प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
**सहसंपादक**-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

# आ.केराम यांच्या आदेशालाही महावितरणची केराची टोपली!

## माहूर तालुक्यातील ग्रामीण भागात वीज समस्येने जनता हैराण

माहूर/प्रतिनिधी-किनवट व माहूर तालुक्यातील ग्रामीण भागात गेल्या दोन महिन्यांपासून सुरू असलेल्या भीषण वीज समस्येमुळे नागरिकांचा संयम संपत चालला आहे. गंभीर वीज समस्यांची दखल घेत आ.भीमराव केराम यांनी जून महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची तातडीची आढावा बैठक घेऊन अधिकाऱ्यांना स्पष्ट शब्दांत फटकारले होते.

ग्रामीण नागरिक व शेतकऱ्यांच्या वीज प्रश्नांबाबत कोणतीही अडवणूक खपवून घेतली जाणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला होता. मात्र, या सूचनांकडे महावितरण प्रशासनाने पूर्णपणे दुर्लक्ष केल्याचे चित्र सध्या दिसून येत आहे. बैठकीनंतर परिस्थिती सुधारण्या ऐवजी अधिकच बिघडली असून, नागरिकांना पूर्वीपेक्षाही मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. दिवसातून तब्बल २० ते २५ वेळा वीजपुरवठा खंडित होत असल्याचा आरोप नागरिक करत आहेत. सततच्या वीजखंडितीमुळे घरगुती कामे, व्यापार, विद्यार्थ्यांचा अभ्यास आणि शेतकऱ्यांची शेतीची कामे पूर्णपणे विस्कळीत झाली आहेत. तीन चार दिवसांपूर्वी माहूर ग्रामीण रुग्णालयाच्या रोहित्रात बिघाड झाल्यानंतर तब्बल २४ तास वीजपुरवठा बंद ठेवण्यात आला. या काळात रुग्ण, रुग्णालय प्रशासन आणि नागरिकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागला. हा बिघाड तातडीने दुरुस्त करण्यात महावितरणला अपयश आल्याने संतापाची लाट उसळली. आ.केराम यांनी बैठकीत वारंवार होणारा वीजपुरवठा खंडित होणे, अवेळी लोडशेडिंग, जीर्ण व धोकादायक विद्युत खांब, अतिरिक्त विद्युत खांबांची गरज आणि शेतीपंपांना पुरेशा दाबाने वीजपुरवठा करण्यासाठी डीपीची क्षमता वाढविण्याचे स्पष्ट निर्देश दिले होते. किनवट व माहूर तालुक्यातील शंभरहून अधिक गावांतील समस्या तातडीने सोडविण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या.मात्र, नागरिकांच्या म्हणण्यानुसार या निर्देशांपैकी एकाही कामाला अपेक्षित गती मिळालेली नाही. वाई बाजार येथे प्रस्तावित १३२ के.व्ही. वीज उपकेंद्राचे काम झाले असले तरी याचा लाभ माहूर ला मिळत नाही हे या तीर्थक्षेत्राचे दुर्दैव आहे.शेजारी १० किमी वर १३२ चे विद्युत केंद्र सुरु होऊन ही परिस्थिती असल्याने भविष्यातील वीज समस्यांवर उपाय होण्याची आशा मावळत चालली आहे. विशेष म्हणजे, वीजपुरवठा खंडित झाल्यानंतर नागरिकांनी महावितरण कार्यालयात संपर्क साधल्यास अनेकदा वरून लाईट गेली आहे असेच उत्तर दिले जात असल्याची तक्रार आहे. हे वरून म्हणजे नेमके कुठून? आभाळातून का?असा उपरोधिक सवाल आता संतप्त नागरिक विचारू लागले आहेत. सततच्या वीजखंडितीमुळे नागरिकांमध्ये तीव्र संतापाचे वातावरण असून, महावितरणने तातडीने ठोस उपाययोजना कराव्यात, अन्यथा तीव्र जनआंदोलन उभे राहण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# हिमायतनगर पोलीसांनी अवैध रेती वाहतूक करणाऱ्या दोन हायवावर केली कारवाई



नांदेड/प्रतिनिधी-हिमायतनगर पोलीसांनी गुरुवारी रात्री सोनारी टोल नाका जवळ तसेच पोटा (बु.) बसस्थानक येथे अवैध रेती वाहतूक करणारे दोन हायवा पकडून चालक व मालका विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या मार्गदर्शनाखाली व हिमायतनगर पोलीस स्टेशनचे पोलीस निरिक्षक लक्ष्मण केंद्रे यांच्या सुचनेवरुन गुरुवारी रात्री फौजदार शेख व पोलीस कर्मचारी गस्त घालीत असतांना सोनारी टोल नाक्याजवळ अवैध रेती वाहतूक करणारा हायवा क्र.एमएच २६ बीएल-८०६१ हा पोलीसांनी पकडला. हायवा मध्ये चार ब्रास रेती पोलीसांना आढळून आली. पोलीसांनी हायवा व रेती जप्त केली. याप्रकरणी हिमायतनगर पोलीस ठाण्यात बाबुराव गणपती पोटुळे व मालक विनायक हजापुरे यांच्या विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच पोटा बु. येथेही पोलीसांनी हायवा क्र.एमएच २६ एडी-२२१४ पकडून जप्त केले आहे. हायवा चालक विजय गोविंद जाधव व मालक राजेश्वर राचेवाड यांच्या विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला.

# सहकार सप्ताहाला हरित स्पर्श;बाजार समिती प्रांगणात वृक्षारोपणाचा उपक्रम



किनवट/प्रतिनिधी-सहकार सप्ताहाच्या औचित्यावर किनवट कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वतीने कार्यालय प्रांगणात सभापती गजाननराव मुंडे पाटील यांच्या हस्ते व मार्गदर्शनाखाली २ जुलै रोजी वृक्षारोपण कार्यक्रम पार पडला. कृषी उत्पन्न बाजार समिती, सहाय्यक निबंधक सहकारी संस्था कार्यालय किनवट आणि तालुका कृषी कार्यालयाच्या सहभाग दिसून आला. पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी सर्वस्तरातून वृक्षारोपण करणे काळाची गरज असल्याचे सभापती गजानन मुंडे पाटील म्हणाले.

सहकार सप्ताहाच्या निमित्ताने किनवट कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती गजाननराव मुंडे पाटील यांनी बाजार समितीच्या प्रांगणात वृक्षारोपण करून वृक्षांचे संवर्धन व संगोपन करण्यासाठी पुढाकार घेतला. सभापतींच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. दरम्यान किनवट तालुका कृषी कार्यालयाचे कृषी अधिकारी चंद्रकांत निमोड, स्थानिकचे सहाय्यक निबंधक दीपक गायकवाड, वरिष्ठ लिपिक आय्यर, मोहन जाधव अंबाडीतांडा, आदी मान्यवरांच्या आणि कर्मचाऱ्यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आल्याचे कळविण्यात आले आहे. एक व्यक्ती एक वृक्ष नको तर दहा वृक्ष लावायला पाहिजे. नैसर्गिक असमतोल वृद्धिंगत होत चालला आहे. पर्यावरणाचा ह्रास थांबता थांबत नाही. म्हणून संतुलित उन्हाळा नाही, पावसाळाही कसा समतोल असणार? म्हणून वृक्ष लागवड ही प्रत्येकाची जबाबदारी असून किमान एक तरी झाड लावण्याचे सभापती मुंडे पाटील यांनी आवाहन केले आहे.

# देगलूर ते अक्कलकोट बस सेवा सुरु



देगलूर/प्रतिनिधी-देगलूर आगारातून दररोज दुपारी २ वाजता सुटणारी देगलूर ते सोलापूर बससेवा आता बंद करून तिच्या ऐवजी देगलर ऐवजी देगलूर, अक्कलकोट ही नवीन बससेवा दि. २ जुलैपासून सुरू करण्यात आली आहे. या निर्णयामुळे अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थांच्या दर्शनासाठी जाणाऱ्या भाविकांसह परिसरातील प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे.

नवीन वेळापत्रकानुसार ही बस दररोज दुपारी १२ वाजता देगलूर आगारातून अक्कलकोटकडे रवाना होणार आहे. अक्कलकोट हे महाराष्ट्रातील प्रसिद्ध धार्मिक स्थळ असल्याने या बससेवेचा लाभ हजारो भाविकांना होणार असल्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. देगलूरहून अक्कलकोटसाठी थेट बससेवा सुरू झाल्याने भाविक आनंदले आहेत. बससेवेच्या शुभारंभ प्रसंगी देगलूर आगाराचे रोज बससेवा व्यवस्थापक संजयकुमार आकुलवार, कार्यशाळा अधीक्षक यमलवाड, आगारातील कर्मचारी उपस्थित होते. आकुलवार यांनी सांगितले की, देगलूर व परिसरातील प्रवाशांच्या मागणीचा विचार करून ही बस सेवा सुरू करण्यात आली असून भाविक आणि सर्वसामान्य प्रवाशांनी या बससेवेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा. अक्कलकोटला जाणाऱ्या प्रवाशांसाठी ही सेवा अधिक सोयीची ठरणार असून धार्मिक पर्यटनालाही त्यामुळे चालना मिळणार आहे.

# मनसेचे माजी तालुकाप्रमुख गजानन कुलकर्णी यांच्यासह अनेकांचा शिवसेनेत प्रवेश

माहूर/प्रतिनिधी-शिवसेना (शिंदे गट) माहूर शहर कार्यालयाचे उद्घाटन दि.१ जुलै रोजी संसदरत्न खा.डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या हस्ते उत्साहात पार पडले. यावेळी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे धडाडीचे कार्यकर्ते, माजी तालुकाप्रमुख तथा उपजिल्हाप्रमुख गजानन कुलकर्णी यांनी आपल्या सहकाऱ्यांसह शिवसेना (शिंदे गट) मध्ये जाहीर प्रवेश केला.

या कार्यक्रमाला संसदरत्न खा.डॉ. श्रीकांत शिंदे, हिंगोली लोकसभा मतदारसंघाचे खा.नागेश पाटील आष्टीकर, हादगाव-हिमायतनगर मतदारसंघाचे आ.बाबुराव कदम, शिवसेना उपनेते तथा संपर्कप्रमुख आनंद जाधव, नांदेड जिल्हाप्रमुख विवेक देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती. याशिवाय माहूर व किनवट तालुकाप्रमुख सुदर्शन नाईक व बालाजी मुरकुटे, शहरप्रमुख विकास कपाटे, पिंटू पाटील, सुरेखा कळमकर, संजय जोशी, अरविंद जयस्वाल, गणेश कुलकर्णी, ज्योती टिपकर, रेणुका जयस्वाल तसेच शिवसेना, युवासेना आणि महिला आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमा दरम्यान नव्याने प्रवेश केलेल्या कार्यकर्त्यांचे मान्यवरांच्या हस्ते स्वागत करण्यात आले. शिवसेना संघटना अधिक बळकट करण्यासाठी सर्वांनी एकजुटीने कार्य करण्याचे आवाहन यावेळी मान्यवरांनी केले.

## सहा हजाराचा गुटखा जप्त

नांदेड/प्रतिनिधी-हदगाव ते मिनकी रोडवर पोलीसांनी शिवदर्शन नंदयाप्पा स्वामी (वय ४४) रा.मिनकी यास अटक केली. त्याच्या जवळून ६ हजाराचा गुटखा व एक दुचाकी जप्त करण्यात आली आहे.

## तामसा येथे जुगार अड्डयावर पोलीसांची धाड

नांदेड/प्रतिनिधी-तामसा येथे सुरु असलेल्या जुगार अड्डयावर गुरुवारी सायंकाळी पोलीसांनी धाड टाकुन सोळा जणांना अटक करण्यात आली.

तामसा येथे सर्रासपणे जुगार अड्डा सुरु होता. सदरील जुगार अड्डयावर गुरुवारी रात्री पोलीसाच्या पथकाने धाड टाकली. पैसे लावून झन्नामन्ना नावाचा जुगार खेळत असतांना पोलीसांनी राहुल राजसिंग परदेशी यांच्यासह पंधरा जणांना अटक करण्यात आली. पोलीसांना या धाडीत ७ हजार ९०० रुपये रोख रक्कम सापडली. रक्कमेविषयी आश्चर्य व्यक्त केले जात आहे. या प्रकरणी तामसा पोलीस ठाण्यात सोळा जणांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


**तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार कंधार यांचे कार्यालय**

Email Id:tahkadhar@gmail.com जा.क्रं.२०२६/ज.मृ.नो./कावी
दुरध्वनी क्र.२२३१००-०२४६६ दिनांक - २८/०६/२०२६

**(जन्म मृत्यू शाखा)**

**जाहीर प्रगटन**

याद्वारे प्रगटन देण्यात येते की अर्जदार मष्णाजी शंकरराव मुकनर रा.हटक्याळ ता.कंधार जि. नांदेड यांनी या कार्यालयात त्यांचा मष्णाजी शंकरराव मुकनर रा.हटक्याळ ता.कंधार जि. नांदेड यांचे जन्म/मृत्यू प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होण्याकरिता मागणी केली आहे.

जन्म/मृत्यू झालेल्यांचे नाव मष्णाजी शंकरराव मुकनर रा.हटक्याळ ता.कंधार या ठिकाणी दिनांक ०४/०६/१९८१ या दिवशी जंन्म/मृत्यू झाला असून प्रमाणपत्र मिळण्याकरिता आदेश होणे करिता सदर तहसील कार्यालय कंधार येथे दिनांक २९/०६/२०२६ रोजी अर्ज सादर केला आहे.

वरील जन्म/मृत्यू दिनांक बाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रकटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप तहसील कार्यालय कंधार येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

स्वाक्षरित/-
तहसीलदार कंधार



**तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार कंधार यांचे कार्यालय**

Email Id:tahkadhar@gmail.com जा.क्रं.२०२६/ज.मृ.नो./कावी
दुरध्वनी क्र.२२३१००-०२४६६ दिनांक - २/०७/२०२६

**(जन्म मृत्यू शाखा)**

**जाहीर प्रगटन**

याद्वारे प्रगटन देण्यात येते की अर्जदार दीपक पिराजी कदम रा.मानसपुरी ता.कंधार जि. नांदेड यांनी या कार्यालयात त्यांचा मुलगा राजरत्न दीपक कदम रा.मानसपुरी ता.कंधार जि. नांदेड यांचे जन्म/मृत्यू प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होण्याकरिता मागणी केली आहे.

जन्म/मृत्यू झालेंल्याचे नाव सावली भूमिका संजीव लोहकरे ता.कंधार या ठिकाणी दिनांक २४/११/२०१८ या दिवशी जन्म/मृत्यू झाला असून प्रमाणपत्र मिळण्याकरिता आदेश होणे करिता सदर तहसील कार्यालय कंधार येथे दिनांक ०३/०७/२०२६ रोजी अर्ज सादर केला आहे.

वरील जन्म/मृत्यू दिनांक बाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रकटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप तहसील कार्यालय कंधार येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

स्वाक्षरित/-
तहसीलदार कंधार



**तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार कंधार यांचे कार्यालय**

Email Id:tahkadhar@gmail.com जा.क्रं.२०२६/ज.मृ.नो./कावी
दुरध्वनी क्र.२२३१००-०२४६६ दिनांक - २/०७/२०२६

**(जन्म मृत्यू शाखा)**

**जाहीर प्रगटन**

याद्वारे प्रगटन देण्यात येते की अर्जदार संजीव पंढरी लोहकरे रा.हटक्याळ ता.कंधार जि. नांदेड यांनी या कार्यालयात त्यांचा मुलीगी भूमिका संजीव लोहकरे रा.हटक्याळ ता.कंधार जि. नांदेड यांचे जन्म/मृत्यू प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होण्याकरिता मागणी केली आहे.

जन्म/मृत्यू झालेल्यांचे नाव सावली भूमिका संजीव लोहकरे ता.कंधार या ठिकाणी दिनांक ०१/०७/२०१७ या दिवशी जंन्म/मृत्यू झाला असून प्रमाणपत्र मिळण्याकरिता आदेश होणे करिता सदर तहसील कार्यालय कंधार येथे दिनांक ०३/०७/२०१६ रोजी अर्ज सादर केला आहे.

वरील जन्म/मृत्यू दिनांक बाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप तहसील कार्यालय कंधार येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

स्वाक्षरित/-
तहसीलदार कंधार



**जाहीर प्रगटन**

दिवाणी किरकोळ अर्ज क्र.१६९/२०२६
(CNR No.MHND100005452026)

अर्जदार :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | शोभाबाई भ्र.बाबुराव परोडवाड | वय-४० वर्षे | धंदा-घरकाम |
| २ | पल्लवी पि.बाबुराव परोडवाड | वय-२८ वर्षे | धंदा-घरकाम |
| ३ | पवन पि.बाबुराव परोडवाड | वय-२६ वर्षे | धंदा-शिक्षण |
| ४ | प्रविण पि.बाबुराव परोडवाड<br>सर्व रा.जंगमवाडी ता.कंधार जि.नांदेड | वय-२३ वर्षे | धंदा-शिक्षण |

विरुद्ध गैरअर्जदार - निरंक

प्रकरण : अर्जदार यांना बॉम्बे रेग्युलेशन (८) १८२७ चे कलम २-अे व ३ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार क्र.१ यांचे पती व अर्जदार क्र.२ ते ४ यांचे वडील **बाबुराव तुळशीराम परोडवाड** हे होते. ते दिनांक २१/०६/२०२६ रोजी जंगमवाडी ता.कंधार जि.नांदेड येथे मयत झाले आहे. तसेच अर्जदार क्र.१ ची सासु व अर्जदार क्र.२ ते ४ यांची आजी जनाबाई तुळशीराम परोडवाड ही होती ती यापुर्वीच मयत झाली आहे. अर्जदारांचे म्हणणे आहे की **बाबुराव तुळशीराम परोडवाड** यांचे अर्जदारा शिवाय इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

उपरोक्त अर्जदार यांना मयत **बाबुराव तुळशीराम परोडवाड** यांचे वारस असलेबाबत शासकीय कामासाठी वारसा प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने वारसा प्रमाणपत्र मिळणेसाठी या न्यायालयात त्यांनी अर्ज केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस व हितसंबंधीतांना या जाहीर नोटीसद्वारे सूचित करण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांना मयत **बाबुराव तुळशीराम परोडवाड** यांचे वारस म्हणून वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणाचा आक्षेप किंवा उजर असेल तर ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसात किंवा तत्पुर्वी या न्यायालयात स्वतः अथवा वकिलांमार्फत हजर राहून आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा कोणाचाही आक्षेप नाही असे समजून योग्य तो हुकुम पारीत केला जाईल याची नोंद घ्यावी.

प्रकरणाची पुढील तारीख - २४/०६/२०२६

आज रोजी दि.०५/०५/२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
सह दिवाणी न्यायालय
क.स्तर,कंधार

आदेशावरुन
स्वाक्षरित/-
**सहायक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय क.स्तर,कंधार



**जाहीर प्रगटन**

नांदेड येथील ६ वे सह दिवाणी न्यायाधिश क.स्तर, नांदेड
यांच्या न्यायालयात
(समक्ष पी.ए.खंडारे)
किरकोळ दिवाणी अर्ज क्र.९१२/२०२६
परवीन बेगम व इतर वि.निरंक

अर्जदार : १. परवीन बेगम भ्र.मोहम्मद जाफर वय : ४५ वर्षे धंदा : घरकाम, २. शेख मोहम्मद अजहर पि.शेख मोहम्मद जाफर वय : २६ वर्षे धंदा : मजुरी, ३. शेख मजहर पि.शेख जाफर वय : २४ वर्षे धंदा : मजुरी, ४. शेख मुस्तफा पि.शेख जाफर वय : १७ वर्षे धंदा : शिक्षण, अ.पा.क.आई अर्जदार क्र.१, ५. आबेदा बी भ्र.शेख हुसेन वय : ८५ वर्षे धंदा : निरंक सर्व रा.देगलूरनाका,नांदेड ता.जि.नांदेड

विरुद्ध

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : वारसा प्रमाणपत्र मिळण्याचा अर्ज

ज्याअर्थी अर्जदाराने या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. वरील अर्जदार मयत मोहम्मद जाफर पि.मोहम्मद हुसैन पि.शेख हुसेन यांचे वारस आहेत. मयत मोहम्मद जाफर पि.मोहम्मद हुसैन पि.शेख हुसेन यांचा दिनांक २४/०९/२०२५ रोजी मृत्यु झाला आहे. अर्जदारांनी अर्जामध्ये नमूद केले आहे की, अर्जदार क्र.१ हा मयताची पत्नी, अर्जदार क्र.२ ते ४ ही मयताची मुले अर्जदार क्र.५ ही मयताची आई आहे.

वर नमुद अर्जदाराशिवाय ईतर कोणीही मयताचे कायदेशिर वारसदार नसल्याचे अर्जदाराने अर्जात कथन केले आहे.

तरी, प्रस्तुत प्रकरणी अर्जदाराच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी तो स्वतः हजर राहून या न्यायालयात दिनांक १२/०८/२०२६ रोजी किंवा एक महिन्याच्या आत नोंदवावा. मुदतीनंतर येणाऱ्या आक्षेपांचा विचार करण्यात येणार नाही व अर्जाची पुढील सुनावणी करण्यात येईल.

आज दिनांक २/०७/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्याने दिला.

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपिक**
६ वे सह दिवाणी न्यायालय
क.स्तर,नांदेड

''आदेशावरुन''
स्वाक्षरित/-
**सहा.अधिक्षक**
दिवाणी न्यायालय व.स्तर,नांदेड



**तहसिल कार्यालय धर्माबाद**

जा/२०२४ क्र.कावी/२०८ दिनांक - २०/१२/२०२४

**प्रकरण : जन्म नोंद घेणे बाबत**

अर्ज क्र.२०८/२०२४

**जाहीर प्रगटन**

ज्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यास येते कि, अर्जदार नामे साईनाथ मारोती गायकवाड वय : २९ वर्षे, धंदा : शेती रा.सालेगाव ध.ता. धर्माबाद जि.नांदेड यांनी या कार्यालयात हजर राहून जन्म-मृत्यू नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ अन्वये दि.१८/१२/२०२४ रोजी जन्म नोंद घेण्यासाठी अर्ज दाखल केला आहे.

साईनाथ मारोती गायकवाड रा.सालेगाव ध.ता.धर्माबाद जि.नांदेड यांची मुलगी कु.श्रावणी साईनाथ गायकवाड जन्म दि.१३/०८/२०१८ रोजीची नोंद ग्रा.पं.कार्यालय सालेगाव ध.ता.धर्माबाद जि.नांदेड येथे उपलब्ध नाही.

त्याअर्थी या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस व संबधितास कळविण्यात येते कि, अर्जदार यांच्या मुलीची जन्माची नोंद घेण्यासाठी कोणाचा काही आक्षेप अथवा उजर असल्यास त्यांनी जाहीर प्रगटन प्रसिध्द झाले पासुन तीस दिवसात या न्यायालयात स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून आपला आक्षेप नोंदवावा. विहीत कालावधीत हजर राहून आक्षेप किंवा उजर न केल्यास सदरच्या अर्जावर एकतर्फी आदेश पारित करण्यात येईल.

आज दिनांक : २०/१२/२०२४ रोजी माझ्या सहीनिशी व कार्यालयाच्या शिक्क्यानिशी जाहिर प्रगटण प्रसिध्द करण्यासाठी देण्यात येत आहे.

स्वाक्षरित/-
ना.तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी
धर्माबाद

# नांदेड-लातूर रेल्वेला हिरवा कंदील; माहूरचा रेल्वे प्रश्न अजूनही 'वेटिंग'वर!

**सरफराज दोसानी**

माहूर-तत्कालीन केंद्रीय राज्यमंत्री सूर्यकांता पाटील यांच्या प्रयत्नातून किनवट पर्यंत रेल्वे पोहोचली, हा इतिहास आहे. मात्र त्यानंतर तब्बल अनेक वर्षे हिंगोली लोकसभा मतदारसंघातील किनवट-माहूर हा आदिवासी व बंजारा बहुल भाग केंद्र सरकारच्या महत्त्वाच्या विकास प्रकल्पांपासून कायम वंचित राहिल्याचे वास्तव आजही बदललेले नाही.

राज्यात आणि केंद्रात वेगवेगळ्या पक्षांची सत्ता असल्याने या भागाच्या विकासावर नेहमीच परिणाम झाला. परिणामी, रस्ते, उद्योग, रेल्वे आणि इतर पायाभूत सुविधांच्या बाबतीत हा परिसर मागेच राहिला. आता मात्र परिस्थिती बदलली आहे. हिंगोलीचे खा.नागेश पाटील आष्टीकर यांनी उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष सोडून सत्ताधारी शिवसेनेत प्रवेश केला असून, विकासासाठी सत्तेत आलो, असा दावा त्यांनी केला आहे. त्यामुळे आता माहूरकरांची अपेक्षा आणखी वाढली आहे.

दुसरीकडे, नांदेड जिल्ह्याचे राजकारण म्हटले की चव्हाण कुंटुबाकडे विकासाचे नेतृत्व म्हणून पाहिले जाते. माजी मुख्यमंत्री स्वर्गीय शंकरराव चव्हाण आणि खा.अशोक चव्हाण हे माहूरगडावरील श्री रेणुकामाता



आणि भगवान दत्तात्रेय यांचे निस्सीम भक्त म्हणून ओळखले जातात. त्यामुळे माहूरच्या विकासासाठी त्यांनी विशेष पुढाकार घ्यावा, अशी जनतेची भावना आहे. नुकताच नांदेड-लातूर या बहुप्रतिक्षित रेल्वेमार्गाला खा.अशोक चव्हाण यांच्या विशेष प्रयत्नांमुळे गती मिळाली आहे. क्षेत्रीय सर्वेक्षण पूर्ण झाले असून सध्या सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार करण्याचे काम सुरू असल्याची माहिती रेल्वे राज्यमंत्री रवनीत सिंह यांनी पत्राद्वारे दिली आहे. ही जिल्ह्यासाठी निश्चितच आनंदाची बाब आहे. मात्र लातूरला रेल्वे येऊ शकते मग माहूरला का नाही असा प्रश्न माहूर भाविक भक्त आणि स्थानिक नागरिकांना पडला आहे. देशभरातून येणारे लाखो भाविक, साडेतीन शक्तीपीठांपैकी पूर्ण शक्तीपीठ असलेले माहूर आजही रेल्वेपासून वंचित आहे. ही केवळ विकासाची नव्हे तर श्रद्धास्थानाच्या दुर्लक्षाचीही बाब मानली जात आहे.

आदिलाबाद-माहूर-पुसद-वाशिम या रेल्वेमार्गाचा प्रस्ताव तब्बल २२ वर्षांपासून प्रलंबित आहे. तर आता यवतमाळ आर्णी माहूर-किनवट या मार्गाची मागणी पुढे आली आहे. माहूरला रेल्वे जोडणी झाल्यास धार्मिक पर्यटनाला मोठी चालना मिळेल. हजारो युवकांना रोजगाराच्या संधी निर्माण होतील. व्यापार, उद्योग, शेतीमालाची वाहतूक आणि स्थानिक अर्थव्यवस्थेला नवी दिशा मिळेल. त्यामुळे हा प्रकल्प केवळ रेल्वे मार्ग नसून संपूर्ण परिसराच्या विकासाचा महामार्ग ठरू शकतो. आज केंद्रात आणि राज्यात सत्ताधारी पक्षाशी संबंधित लोकप्रतिनिधी आहेत. अशा वेळी माहूरच्या रेल्वे प्रश्नासाठी संसदेत आणि रेल्वे मंत्रालयात ठोस पाठपुरावा करून हा प्रकल्प मंजूर करून घेण्याची जबाबदारी खा.अशोक चव्हाण आणि खा.नागेश पाटील आष्टीकर यांच्यावर आहे.

# आशा भोसले यांच्या नावाने 'जीवनगौरव पुरस्कार'

मुंबई/प्रतिनिधी-राज्य सरकारने संगीत क्षेत्रातील ज्येष्ठ कलाकारांच्या सन्मानासाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेतला असून, ज्येष्ठ पार्श्वगायिका आशा भोसले यांच्या नावाने 'आशा भोसले जीवनगौरव पुरस्कार' सुरू करण्याची घोषणा केली आहे. सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांनी गुरुवारी विधानसभेत याबाबत घोषणा केली. 'सुरसम्राज्ञी लता मंगेशकर जीवनगौरव पुरस्कारा'च्या धर्तीवर हा नवा पुरस्कार सुरू केला आहे.

सरकारच्या निर्णयानुसार, हा पुरस्कार दरवर्षी ८ सप्टेंबर रोजी, आशा भोसले यांच्या जन्मदिनाच्या निमित्ताने प्रदान करण्यात येईल. पुरस्कार विजेत्याला १० लाख रुपये रोख, शाल आणि श्रीफळ देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. हा पुरस्कार केवळ आर्थिक सन्मान नसून, आयुष्यभर संगीत क्षेत्रासाठी दिलेल्या योगदानाची अधिकृत दखल असल्याचे सरकारने स्पष्ट केले आहे.पुरस्कारासाठी पात्र कलाकारांची निवड पारदर्शक आणि गुणवत्तेच्या निकषांवर व्हावी, यासाठी संगीत आणि गायन क्षेत्रातील तज्ज्ञांची स्वतंत्र समिती स्थापन करण्यात येणार आहे. ही समिती पुरस्कारासाठी योग्य कलाकारांची निवड करणार असून, पुरस्काराची प्रतिष्ठा कायम राखण्यावर सरकारचा भर असेल.

# पोमनाळा येथे जाऊन तहसीलदार गुंडमवार यांनी बीएलओ ॲपमध्ये भरले मतदानगणना पत्र

भोकर/प्रतिनिधी-निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार मतदार यादी सखोल पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत भोकर तालुक्यात गतिमान काम करण्यात आले असून तहसीलदार विनोद गुंडमवार यांनी पोमनाळा येथे प्रत्यक्ष जाऊन २ जून रोजी मतदारांचे गणना पत्र बीएलओ ॲपमध्ये भरले आणि त्याबाबत इतरांना मार्गदर्शन केले.



भोकर तालुक्यात मतदार यादी विशेष पुनरिक्षण कार्यक्रम गतिमान करण्यात आला असून बी.एल.ओ., बी.एल.ए, राजकीय पदाधिकारी, पक्षप्रमुख यांच्या बैठका घेऊन मार्गदर्शन करण्यात आले. त्यानुसार २९ जून पासून प्रत्येक गावामध्ये मतदार यादी यांचे पुनरिक्षण करण्यात येत आहे. प्रत्येक मतदारांना फार्म देऊन त्यामध्ये सर्व माहिती भरून बीएलओ ॲप मध्ये डिजिटायझेशन करावयाची आहे. प्रत्यक्ष कामाला २९ जून पासून सुरुवात झाली. २ जून रोजी पोमनाळा येथे जाऊन तहसीलदार विनोद गुंडमवार यांनी रामचंद्र सोळंके यांचे मतदान गणना पत्र भरून बीएलओ ॲप मध्ये डिजिटायझेशन केले.

# समाधानकारक पावसाने खरीप पेरणीला वेग;कुंडलवाडी परिसरातील शेतशिवार गजबजले

कुंडलवाडी/प्रतिनिधी-कुंडलवाडी व परिसरात गेल्या काही दिवसांत झालेल्या समाधानकारक पावसामुळे खरीप हंगामातील पेरणीच्या कामांना वेग आला आहे. अनेक दिवसांपासून पावसाच्या प्रतीक्षेत असलेले शेतकरी आता शेतात उतरले असून, गेल्या दोन-तीन दिवसांपासून सर्वत्र पेरणीची लगबग सुरू असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

पावसामुळे जमिनीत पुरेसा ओलावा निर्माण झाल्याने शेतकरी ट्रॅक्टर, पेरणी यंत्र तसेच बैलाच्या सहाय्याने पेरणीची कामे युद्धपातळीवर करत आहेत. कुंडलवाडी परिसरातील शेती प्रामुख्याने पावसावर अवलंबून असल्याने जून महिन्यातील पावसाकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागून होते. पेरणीसाठी आवश्यक बियाणे व इतर साहित्याची पूर्वतयारी शेतकऱ्यांनी करून ठेवली होती. अनुकूल पावसामुळे आता प्रत्यक्ष पेरणीला गती मिळाली आहे.या भागात खरीप हंगामात सोयाबीन, कापूस, तूर, मूग आणि उडीद या पिकांची मोठ्या प्रमाणावर लागवड केली जाते. सध्या शेतशिवारात सर्वत्र पेरणीची धामधूम सुरू असून कृषी सेवा केंद्रांवर बियाणे व खत



खरेदीसाठी शेतकऱ्यांची गर्दी वाढली आहे.यापुढील काळातही पावसाचा नियमितपणा कायम राहिल्यास पिकांची उगवण चांगली होऊन उत्पादनात वाढ होईल, अशी आशा शेतकऱ्यांकडून व्यक्त केली जात आहे. समाधानकारक पावसामुळे शेतकऱ्यांमध्ये नव्या हंगामाबाबत आशावादी वातावरण निर्माण झाले आहे.

# साने गुरुजी रुग्णालयातील चोरी प्रकरणी चौकीदारासह एकास अटक

किनवट/प्रतिनिधी-कोठारी एम.आय.डी.सी.तील साने गुरुजी हॉस्पीटलमधून चोरीला गेलेले साहित्य किनवट पोलीसांनी दुधगाव येथील अविनाश बालाजी मुंडे (वय ३५) यांच्याकडून हस्तगत केले आहे. त्याच हॉस्पीटलमधील मारोती बेलखोडे (वय ६५, रा.जिजामाता वार्ड, वरोरा जि.चंद्रपूर) हाच चौकीदार या चोरी प्रकरणात निघाला चोर. जवळपास ८१ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करून चोरट्यांना ताब्यात घेण्यास किनवट पोलीसांना यश मिळाले.



कोठारी एमआयडीसी लगत साने गुरुजी हॉस्पीटल आहे. प्रांगणात बांधकाम उपयोगी साहित्य असून तेथे चंद्रपूर जिल्ह्यातील वरोरा, जिजामाता वार्डातील रहिवासी असलेला दशरथ बेलखोडे हा या हॉस्पीटलमध्ये चौकीदार म्हणून काम पहातो. हा चौकीदार बेलखोडे आणि दुधगाव येथील अविनाश मुंडे यांनी संगनमत करुन ४० किलो वजनाचे वालपुटीचे ४१ हजार ६०० रूपये किंमतीचे ४० पोते. २० लिटरचे १० सिलवंद बकेट ज्याची २७ हजार किंमत आहे. टाईल्स ३२ नग, ज्याची किंमत ९ हजार रूपये तसेच दुसऱ्या ३० टाईल्सचे तुकड्याचे ३ हजार रूपये असा ८१ हजार रूपयाचा मुद्देमाल गुन्ह्यात जप्त करण्यात आल्याचे सूत्रांनी सांगितले. या गुन्ह्यात वापरलेली एक बजाज कंपनीची एम.एच.२६-बी.आर.-०७७५, ४० हजार रुपयांची जुनी प्लेटिना गाडी जप्त करण्यात आली आहे. पोलीस निरीक्षक गणेश कराड यांच्या मार्गदर्शनाखाली पोउनि. लेनगुळे, पोहेकाँ. मेडके, पोहेकाँ.चंद्रशेखर मुंडे, पोकाँ. जाधव यांनी महत्वाची भूमिका बजावली.

# ग्राहकांना स्मार्ट मीटरच्या सक्तीमुळे निवडीच्या अधिकारावर गदा?

देगलूर/प्रतिनिधी-देगलूर येथील वीज वितरण कंपनीच्या कार्यालयात केवळ स्मार्ट मीटर उपलब्ध असल्यामुळे नवीन वीज मीटर घेताना ग्राहकांना त्यांच्या पसंतीचा पर्याय निवडता येत नाही, यामुळे ग्राहकांच्या अधिकारावर गदा येत असल्याचे चित्र निर्माण झाले आहे.

देगलूर येथील वीज वितरण कार्यालयात परिसरातील अनेक गावातील ग्राहक नवीन वीज मीटर साठी येतात सध्या या कार्यालयात साधे (नॉन स्मार्ट) वीज मीटर उपलब्ध नसून केवळ स्मार्ट मीटर उपलब्ध आहेत. वीज वितरण विभागाने नवीन तंत्रज्ञानाची मीटर आणले असले तरी पुरेशा जनजागृतीच्या अभावामुळे ग्राहकांना स्मार्ट मीटर बाबत स्पष्ट माहिती नाही. या मीटरच्या कार्यपद्धती बाबत अनेक ग्राहकांच्या मनात शंका व भीती आहे. त्यामुळे अनेक ग्राहक स्मार्ट मीटर बसविण्यास इच्छुक नाहीत. सध्या कार्यालयात जुन्या पद्धतीचे 'नॉन स्मार्ट मिटर उपलब्ध नसल्यामुळे ग्राहकाकडे निवडी साठी कोणताही पर्याय उरलेला नाही. नवीन तंत्रज्ञानाचा स्वीकार करणे चुकीचे नसले तरी ते ग्राहकावर लागणे योग्य नाही. ग्राहकांच्या निवडीचा अधिकार लक्षात घेऊन वीज वितरण कार्यालयाने स्मार्ट आणि नॉन-स्मार्ट अशा दोन्ही प्रकारच्या मीटरची उपलब्धता करावी, अशी मागणी जोर धरत आहे. वीज वितरण कंपनीने नवनवीन तंत्रज्ञानाचा अवलंब करताना ग्राहकांचा विचार करून पारदर्शक व ग्राहकभिमुख धोरण राबवावे, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

पान १ वरुन

## राम मंदिर दानचोरीमुळे...

बांधलेले हे भव्य मंदिर संपूर्ण हिंदू समाजासाठी आदर, श्रद्धा आणि भक्तीचे केंद्र बनले आहे. अयोध्येतील श्रीरामलल्ला मंदिरातील दानपेट्यांमध्ये जमा केलेल्या निधीच्या चोरीच्या दुर्दैवी घटनेने संपूर्ण समाजाच्या आणि रामभक्तांच्या भावना तसेच आस्थेला धक्का बसला आहे. या घटनेमुळे आम्ही सर्व दुःखी झालो आहोत. असे म्हणत त्यांनी खंत व्यक्त केली.

पान १ वरुन

## राज्यातील शाळांभोवती...

पेयांच्या विक्रीवर तात्काळ बंदी घालण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.याशिवाय विद्यार्थ्यांमध्ये एनर्जी ड्रिंक्सच्या दुष्परिणामांबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी राज्यभरातील शाळांमध्ये विशेष जनजागृती मोहीम राबविण्यात येणार असल्याची माहितीही त्यांनी दिली. या निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी अन्न व औषध प्रशासन तसेच शिक्षण विभागाला आवश्यक सूचना देण्यात आल्याचे मंत्री झिरवाळ यांनी स्पष्ट केले.

## उमरखेड येथील व्यापाऱ्याच्या...

बँकेसमोर सुरवसे हे कार थांबवून कामानिमित्त बँकेत गेले असताना अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या कारमधील ४ लाख रुपये रक्कम असलेली बॅग चोरुन नेली आहे. घटनेची माहिती समजताच भाग्यनगर पोलीस स्टेशनचे अधिकारी व कर्मचारी तसेच एलसीबीचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. पोलीसांनी मुख्य रस्त्यावरील सीसीटीव्ही फुटेज तपासून आरोपींचा शोध सुरु केला आहे. वर्दळीच्या रस्त्यावरुन व्यापाऱ्याची बॅग चोरट्यांनी चोरी केल्याच्या घटनेमुळे खळबळ उडाली आहे.

## राम मंदिर दानचोरीवरुन...

असे आवाहन ठाकरेंनी केले. यावेळी उद्धव ठाकरे यांनी अयोध्येला जाणार असल्याचे सांगितले. मात्र, कधी हे स्पष्ट केलेले नाही. तसेच हृदयात राम, हाताला काम आणि शेतमालाला दाम हेच आमचे हिंदुत्व असल्याचे त्यांनी पुन्हा स्पष्ट केले. तसेच ५ जुलैला मुंबईत रामरक्षा आंदोलन केल्यानंतर राज्यभर, जिल्ह्यामध्ये, शहरांमध्ये जिथे जिथे राम मंदिर असेल, हनुमान मंदिर असेल, तिथे हे सर्व हिंदू, सर्व रामभक्तांनी एकत्र यावे, असे आवाहन उद्धव ठाकरे यांनी केले.

## जाहीर प्रगटन

नांदेड येथील ५ वे सह दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर नांदेड यांच्या न्यायालयात
समक्ष (श्रीमती के.बी.सोनवणे)
किरकोळ दिवाणी अर्ज (आर.जे.ई.) क्र.९०३/२०२६
पुढील तारीख १०/०८/२०२६
नसरिन नाज व इतर विरुध्द निरंक

अर्जदार :- १. नसरिन नाज भ्र.अल्ताफ शेख ऊर्फ खाटीक वय ४८ वर्ष, धंदा : घरकाम, २. मुकित पि.अल्ताफ शेख ऊर्फ खाटीक वय २२ वर्ष, धंदा : शिक्षण, ३. फरहान पि.अल्ताफ शेख ऊर्फ खाटीक वय २१ वर्ष, धंदा : शिक्षण सर्व रा.वडजाई रोड, धुळे ता.जि.धुळे.

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण :- वारसा प्रमाणपत्र मिळण्याचा अर्ज.

ज्याअर्थी अर्जदाराने या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळणेसाठी अर्ज केला आहे. मयत नामे अल्ताफ पि. मुज्जफर हुसेन शेख ऊर्फ खाटीक यांचा मृत्यु दिनांक २६/०४/२०१४ रोजी नांदेड येथे झाला आहे. अर्जदार क्र. १ ही मयताची पत्नी आहे. अर्जदार क्र.२ व ३ ही मयताची मुले आहेत. वर नमुद अर्जदारा शिवाय इतर कोणतेही मयताचे कायदेशीर वारस नसल्याने अर्जदाराने अर्जात कथन केले आहे. अर्जदारांनी मा. न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. तरी प्रस्तुत प्रकरणी अर्जदाराच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी ते स्वत: हजर राहुन या न्यायालयात दिनांक १०/०८/२०२६ रोजी किंवा त्यापुर्वी उजर नोंदवावा. मुद्दतीनंतर येणाऱ्या उजर आक्षेपास विचार करण्यात येणार नाही व अर्जाची पुढील सुनावणी करण्यात येईल. आज दिनांक ०२/०७/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्कयानिशी दिले आहे.

आदेशावरुन

स्वाक्षरित/-
कनिष्ठ लिपीक
५ वे सह दि.न्या.क.स्तर,नांदेड

स्वाक्षरित/-
सहाय्यक अधिक्षक
दि.न्या.व.स्तर,नांदेड

---

जा.क्र.नांवाशमनपा/क्षे.का.०१/नापवि/७२०/२०२६
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.
दिनांक : २९-६-२०२६

## जाहीर प्रगटन

**संचिका क्रं.NT/०१/१४१४८/क्षे.का.क्र.१ तरोडा-सांगवी**
**प्रकरण : नांव परिवर्तन करणे बाबत.**

या जाहीर प्रगटनाच्या आधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की **सौ.सुधाबाई नारायणराव धोपटे** रा.**तरोडा बु.**, नांदेड यांनी या कार्यालयात अर्ज सादर केला आहे की, ता.नि.भु.अ.पत्र क्र.**१०५१/०९ दि.३०/१०/२००९ तरोडा बु. गट नं.२७३ पैकी प्लॉट क्रं.११ चा उ भाग पिन क्र.४०१०३०७१८२७** श्री. **इमरान खॉन शमशीर खान** यांच्या नावे असलेली मालमत्ता यांचेकडुन अर्ज **खरेदीखत क्र.४०८७ दि.२८/०४/२०२६** च्या आधारे विकत घेतली आहे./वारसा हक्क प्राप्त झालेली आहे. तरी त्यांचे नांवे कर आकारणी नोंद वहीत घेण्यासाठी जाहिर प्रगटन देण्यात येत आहे.

तरी या संबंधात कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी हे पत्रक प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून (१५) दिवसाच्या आत या कार्यालयात आपला लेखी आक्षेप पुराव्यासहीत दाखल करावा. अन्यथा अवधी संपल्यानंतर अर्जदाराच्या नांवे वरील प्रमाणे मालमत्ता नोंदविण्यात येईल.

**चर्तुःसिमाः- पुर्व**- ४० फुट रुंद रस्ता आहे, **पश्चिम-**प्लॉट नं.१४ आहे, **दक्षिण-**सदरील प्लॉटचा उर्वरीत भाग आहे, **उत्तर-**प्लॉट नं.०८ आहे.

स्वाक्षरित/-
**सहाय्यक आयुक्त,**
क्षे.का.क्रं.०१ तरोडा सांगवी,
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार कंधार यांचे कार्यालय**

Email Id:tahkadhar@gmail.com जा.क्रं.२०२६/ज.मृ.नो./कावी
दुरध्वनी क्र.२२३१००-०२४६६ दिनांक - २८/०६/२०२६

**(जन्म मृत्यू शाखा)**

## जाहीर प्रगटन

याद्वारे प्रगटन देण्यात येते की अर्जदार पाईतवार रणधीर विश्वनाथ रा.नंदनवन ता.कंधार जि.नांदेड यांनी या कार्यालयात त्यांचा पाईतवार रणधीर विश्वनाथ रा.नंदनवन ता.कंधार जि.नांदेड यांचे जन्म/मृत्यू प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होण्याकरिता मागणी केली आहे.

जन्म/मृत्यू झालेल्यांचे नाव पाईतवार रणधीर विश्वनाथ रा.नंदनवन ता.कंधार या ठिकाणी दिनांक १५/०६/१९८९ या दिवशी जन्म/मृत्यू झाला असून प्रमाणपत्र मिळण्याकरिता आदेश होणे करिता सदर तहसील कार्यालय कंधार येथे दिनांक १९/०६/२०२६ रोजी अर्ज सादर केला आहे.

वरील जन्म /मृत्यू दिनांक बाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप तहसील कार्यालय कंधार येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार केला जाणार नाही.

स्वाक्षरित/-
तहसीलदार कंधार

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग ॲण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com, मो.९४२२१७४७७४